**संपादकीय......**

शिवाजी शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद 29 वे अधिवेशन

भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय राज्यघटना @ 75 वर्ष वाटचाल आणि आव्हाने या विषया अंतर्गत शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदे चे 29 वे अधिवेशन आणि दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र दिनांक 13 व 14 मार्च 2024 रोजी सहकार भूषण एस के पाटील कॉलेज येथे संपन्न झाले. या परिषदेने भारतीय राज्यघटनेची वाटचाल आणि आव्हाने आंतरराष्ट्रीय राजकारण लोकप्रशासन तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची 350 वर्ष या विषयावर 42 शोधनिबंध सादर केले गेले तर 80 संशोधक विद्यार्थी प्राध्यापक यांनी नाव नोंदणी केली या अंकास संशोधन लेखकांचा अपूर्व असा प्रतिसाद लाभलेला आहे हे सर्व लेख 'नवज्योत' या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध करण्यात येत असून याचा मनस्वी आनंद होत आहे. संशोधक प्राध्यापक विद्यार्थी यांना या पत्रिकेमुळे एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे

या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील थोर विचारवंत राष्ट्रीय विश्लेषक लेखक डॉ अशोक चौसाळकर, किशोर बेडकीहाळ, डॉ श्रीमंत कोकाटे, डॉ चंद्रकांत भांगे, यांनी सखोल मार्गदर्शन केले घटनात्मक चौकटीत राहून संस्थात्मक मूल्यांची जोपासना केली पाहिजे तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीला असणारे धोके सांगितले आहेत त्याचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे आजची वस्तुस्थिती आणि भविष्यकाळ याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे छत्रपती शिवाजी महाराजांचे रयतेचे राज्य आणि आजच्या तळातील माणूस भूतकाळ वर्तमान आणि भविष्य हे पाहता आले पाहिजे या परिषदे साठी संमेलनाध्यक्ष डॉ व्ही एम पाटील हे होते तर डॉ शिवाजी पाटील व सर्व कार्यकारिणीने परिषदेचे संयोजन केले डॉ. शिवाजी पाटील यांनी राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 75 व्याख्यानांचा संकल्प केला व संविधान उद्देशिका महाविद्यालयास भेट दिली डॉ. भारती पाटील, डॉ. वासंती रासम, डॉ. रवींद्र भणगे डॉ. सुखदेव उंद्रे, श्री विनय मांडके इत्यादी मान्यवर उपस्थित होते

या अंकातील लेख संशोधकांना वाचकांना निश्चितच मार्गदर्शक ठरतील या उद्देश या पत्रिकेचे प्रमुख संपादक डॉ. रवींद्र भणगे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी ऋणी आहे लेखांचे संकलन नियोजन डॉ. राहुल नागुडेकर यांनी केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर एस कदम उपप्राचार्य डॉ एस डी चव्हाण व सर्व स्टाफ यांच्या सहकार्याबद्दल आभार

या संशोधन पत्रिकेतील सर्व लेखकांचे आभार संपादक मंडळाचे आभार हा अंक निश्चितच ऐतिहासिक ठरेल राज्यघटनेच्या अमृत महोत्सवानिमित्याने या अंकाचे सर्वजण स्वागत करतील व भारतीय राज्यघटनेच्या वाटचालीत काही अंशि का होईना विचार प्रेरणादायी ठरतील अशी आशा व्यक्त करते व नवज्योत या संशोधन पत्रिकेच्या वाटचालीस शुभेच्छा देते.

**डॉ सौ श्रद्धा कोठावळे**

समन्वयक सहकार भूषण एस के पाटील

कॉलेज कुरुंदवाड.

982276 7014